इयत्ता ९ वी व १० वी मध्ये शिकत असणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना भारत सरकारची मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजना लागू करणेबाबत.

## महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

शासन निर्णय क्रमांकः इबीसी २०१२/प्र.क्र. १५१/शिक्षण - १

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक

मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२

तारीख: ०४ ऑक्टोंबर, २०१३

वाचा —

१. शासन निर्णय क्रमांकः इबीसी: २००३/प्र.क्र.११६/मावक-२, दि. २३ मे, २००३

२. शासन पत्र क्रमांकः सामाजिक न्याय और अधिकारिता मंत्रालय शास्त्री भवन, नई दिल्ली यांचे पत्र क्र. ११०११/०२/२००८-SCD-V, दि. २२ जून, २०१२

**प्रस्तावना :**

अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांचे शाळेतील गळतीचे प्रमाण कमी व्हावे या उद्देशाने केंद्र शासनाने दि. १ जुलै, २०१२ पासून इयत्ता ९ वी व १० वी मध्ये शिकत असणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजना सूरू केली आहे. सदरहू योजना ही राज्यात लागू करणेबाबत केंद्र शासनाने कळविलेले आहे. त्यानुसार सदरहू योजना राज्यात लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याप्रमाणे प्रस्ताव मा. मंत्रीमंडळासमोर सादर करण्यात येऊन मा. मंत्रीमंडळाने दिलेल्या मान्यतेनुसार पुढील आदेश देण्यात येत आहेत.

**शासन निर्णय:**

केंद्र शासनाने त्यांच्या दि. २२/०६/२०१२ च्या पत्रानुसार भारत सरकार मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजना ही इयत्ता ९ वी व १० वी मध्ये शिकत असणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी सुरू केलेली आहे. सदर योजना राज्यातील इयत्ता ९ वी व १० वी मध्ये शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षापासून लागू करण्यास मान्यता देत आहे.

१. सदर योजनेअंतर्गत शिष्यवृत्ती व इतर अनुदानाचे दर खालील प्रमाणे राहतील

(१० महिन्यांसाठी)

| अ. क्र. | योजना | वसतीगृहात न राहणारे (अनिवासी) | वसतीगृहात राहणारे (निवासी) |
|---|---|---|---|
| १ | शिष्यवृत्तीचे दर (प्रतिमाह) | रु.१५० | रु.३५० |
| २ | पुस्तके व तदर्थ अनुदान (वार्षिक) | रु.७५० | रु.१,००० |

२. वरीलप्रमाणे शिष्यवृत्तीशिवाय विनाअनुदानित शाळेतील अपंग विद्यार्थ्यांकरिता अतिरिक्त भत्ते पुढीलप्रमाणे आहेत :-

| अ. क्र. | भत्त्याचा प्रकार | मासिक भत्त्याची रक्कम |
|---|---|---|
| १ | अंध विद्यार्थ्यांसाठी वाचक भत्ता | रु.१६०/- |
| २ | वसतीगृहात न राहणा-या अपंग विद्यार्थ्यांकरिता वाहतूक भत्ता | रु.१६०/- |
| ३ | अपंग विद्यार्थ्यांच्या सोबत्याकरिता भत्ता | रु.१६०/- |
| ४ | अपंग विद्यार्थ्यांच्या मदतनीसकरिता भत्ता | रु.१६०/- |
| ५ | मंदबुध्दी विद्यार्थ्यांकरिता शिकवणी भत्ता | रु.२४०/- |

३. सदर शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत अटी व शर्ती पुढील प्रमाणे राहतील.

१) सदर योजना शासकिय मान्यता प्राप्त शाळेत शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यास लागू राहिल.

२) सदर योजनेअंतर्गत शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांच्या पालकांच्या उत्पन्नाची मर्यादा रु २.०० लक्ष इतकी असावी.

३) यामध्ये विद्यार्थ्यांच्या किमान गुणांची अट नाही.

४) सदर योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांने अर्ज करणे आवश्यक आहे.

५) सदर योजनेचा लाभ केंद्राच्या इतर माध्यमिक पूर्व शिष्यवृत्तीच्या लाभार्थ्यांना लागू राहणार नाही.

६) या योजनेकरीता राज्य स्तरावर सहआयुक्त (शिक्षण), समाजकल्याण आयुक्तालय,पुणे यांना आणि जिल्हा स्तरावर जिल्हा समाजकल्याण

अधिकारी, जिल्हा परिषद व समाजकल्याण अधिकारी, (वर्ग-२) बृन्हमुंबई यांना तक्रार निवारण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

(७) राज्य शासनाची सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती ही योजना अनुसूचित जाती प्रवर्गातील इयत्ता ८ वी ते १० वी च्या सर्व मुलींसाठी सद्या सुरु आहे. त्यामध्ये पालकांच्या उत्पन्नाची मर्यादा नाही. मात्र केंद्र शासनाच्या इयत्ता ९ वी व १० वी मध्ये शिकत असणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजनेमध्ये रुपये २.०० लक्ष इतके वार्षिक उत्पन्न असणा-या पालकांच्या इयत्ता ९ वी व १० वी च्या मुलींचा समावेश होणार आहे. त्यामुळे अनुसूचित जाती प्रवर्गातील इयत्ता ८ वी च्या मुली आणि रुपये २.०० लक्ष पेक्षा जास्त उत्पन्न असणा-या पालकांच्या इयत्ता ९ वी व १० वी च्या मुलींकरिता सद्याची **सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना** यापुढेही चालू राहिल. मात्र एकाच लाभार्थ्यास दोन्ही योजनेचा लाभ घेता येणार नाही. त्याअनुषंगाने संबंधीत अधिकऱ्यांनी आवश्यक ती दक्षता घ्यावी.

४. सदर योजनेची अंमलबजावणी ही जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद व समाजकल्याण अधिकारी, (वर्ग-२) बृन्हमुंबई यांचे मार्फत करण्यात येईल.

५. सदर योजनेअंतर्गत शिष्यवृत्तीची रक्कम वितरीत करताना संगणकीकृत व्यवस्थापन प्रणाली वापरण्यात यावी.

६. सध्याच्या १२ व्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत सदर योजनेकरीता केंद्र शासनाकडून १०० % निधी प्राप्त होणार आहे. मात्र त्यानंतर १३ व्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत केंद्र शासनाच्या प्रचलित पद्धतीप्रमाणे राज्याच्या बांधिल दायित्वाचा (committed liability of state) आर्थिक भार राज्य शासनावर येणार आहे. त्याकरिता आवश्यक तरतूद सन २०१६-१७ या आर्थिक वर्षापासून अनुसूचित जाती उपायोजनेअंर्तगत (S.C.S.P.) राज्याच्या अर्थसंकल्पात करण्यात येईल.

७. सदर योजनेच्या अटी व शर्ती केंद्र शासनाच्या दि. २२.०६.२०१२ च्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे राहतील. सदर सूचनांची प्रत सोबत जोडली आहे.

८. सदर शासन निर्णय हा नियोजन व वित्त विभागाच्या (अनौपचारिक संदर्भ क्र. १८/व्यय-१४, दि. १२.०१.२०१३) सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.